**क्रमांक : ४८**

**महाराष्ट्र विधानसभा**

**<u>पत्रक भाग दोन</u>**

**<u>सोमवार, दिनांक १२ एप्रिल, २०२१ / चैत्र २२, १९४३ (शके)</u>**

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**४८.** सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पीय) सत्र शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० रोजी संस्थगित झाले. सन २०२० च्या व्दितीय सत्रातील एकूण **१२४** स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. पटलावर ठेवण्यात आल्यानंतर शाखेत प्राप्त झालेली निवेदने त्याच दिवशी वितरीत करण्यात आली होती. उर्वरित लक्षवेधी सूचनांची निवेदने शाखेत प्राप्त झाल्यानंतर पत्रक भाग-२ व्दारे मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. जोडपत्रातील एकूण **१२४** स्वीकृत लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी शिल्लक **२** निवेदने या शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहे.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १२ एप्रिल, २०२१

**राजेन्द्र भागवत**
सचिव
महाराष्ट्र विधानसभा

**<u>याची प्रत :</u>**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व संबधित सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

४२

# लक्षवेधी सूचना

## मा. श्री. तानाजी मुटकुळे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४२

" हिंगोली जिल्ह्यात राष्ट्रसंत नामदेव महाराज संस्थानाच्या नावे जन्मस्थळ नर्सी नामदेव येथे असलेल्या संस्थानच्या १०९ एकर जमिनीची खिरापत वाटून विकासकामांना जमिनच उपलब्ध नसल्याची बाब निदर्शनास येणे, मंदिर जिर्णोद्धार समितीने विभागिय आयुक्त हे संस्थानाला भेट देण्यास आले असताना सदर बाब निदर्शनास येणे. संस्थानाच्या विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबतच कामाला गती देण्यासाठी जमिन कमी पडत असल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधींनी उपस्थित करणे, संस्थानकडून राष्ट्रसंत नामदेव महाराजांच्या ७५० व्या जयंती निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांची माहिती यावेळी देण्यात येणे. श्री संत गजानन महाराज, संस्थान शेगाव येथे असलेल्या अमन स्थानाच्या धर्तीवर विकास कामे व्हावे यातील न्यास, किर्तन मंडप, दर्शन बारी आदि विकासकामासाठी निधीची आवश्यकता असतानाही न देणे त्यामुळे येथील जनतेत पसरलेला असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

## मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

श्री.संत नर्सी नामदेव संस्थान ता.जि.हिंगोली यांच्या मालकीची १०९ एकर जमीन नसून सदर संस्थानच्या नावे गट क्र. १३२ मध्ये २ हे. ७८ आर व गट क्र. १३३ मध्ये ५१ आर जमीन आहे. सदर तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडयास दि. २७.०२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये रक्कम रू.१५.०० कोटी इतक्या रक्कमेच्या आराखडयास मंजूरी दिली आहे.

सदर आराखडयामध्ये सार्वजनिक शौचालय,सांडपाणी व्यवस्थापन ,भक्तनिवास, सभामंडप, सुरक्षाचौकी, पाणीपुरवठा व स्वच्छता, वाहनतळ, विद्युतीकरण, अग्निशमन यंत्रणा,जमीन विकास,घाट बांधणे इ.कामांस मंजुरी दिलेली आहे. मंजूर रक्कमेपैकी रू. ३.०० कोटी इतका निधी वितरीत केला आहे.

विभागाच्या दि. ४.१२.२०१९ रोजीच्या शासन पत्रान्वये तीर्थक्षेत्र विकास योजनेतील मंजूर कामापैकी ज्या कामांना कार्यारंभ आदेश दिला गेला नाही केवळ अशा कामांना स्थगिती देण्यात आलेली आहे. जी कामे सुरू आहेत, त्यांना कोणतीही स्थगिती दिलेली नाही. या अनुषंगाने विभागाने दि. ६ मार्च,२०२० रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी,हिंगोली यांच्याकडून अहवाल मागवला आहे. विभागाकडून सदर तीर्थक्षेत्रास निधी मंजूर करून निधी वितरण केलेले आहे.

****************************

Rota - H-2025-1 (700-3-2021)

८५

## महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन** **लक्षवेधी सूचना**

**मा. श्री. सुभाष धोटे, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्यातील मुंबई शहर उपनगर येथील न.भू.क्र.608 (पैकी), 668 (पैकी) मौजे वांद्रे, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-51 या जागेवर म्हाडाच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत सोलंकी अँड असोसिएट झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवित असणे; म्हाडाच्या जागेवर म्हाडाची कोणतीही परवानगी न घेता झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मान्यता दिलेली असणे; मुख्य कार्यकारी अधिकारी (म्हाडा)मुंबई व कार्यकारी अभियंता (प), म्हाडा, वांद्रे, मुंबई यांनीही सदर भूखंड झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून वगळणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन अधिकारी यांना कळविले असणे ; मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई यांनीही सदरचा भूखंड झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत समाविष्ट करणे योग्य होणार नाही, असे स्वयंस्पष्ट अभिप्राय दिलेले असणे ; उक्त झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत सदरच्या जागेवरील झोपडपट्टी धारकांनी विकासकाची नियुक्ती रद्द करुन फेर सर्वेक्षण करण्याची मांगणी केलेली असणे ; या संपूर्ण झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाच्या मंजुरीबाबत सखोल चौकशी करुन न.भू.क्र.608(पैकी), 668(पैकी) मौजे वांद्रे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिलेल्या सर्व एल.ओ.आई. रद्द करण्यात याव्यात तसेच फेरसर्वेक्षण करुन अपात्र लाभार्थ्यांची नावे वगळून नव्याने 'परिशिष्ट 2' ची सूची तयार करण्यात यावी व झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत नियमानुसार पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत तेथील रहिवाशांची अनेक दिवसांपासून मांगणी असूनही त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष ; तेथील असहाय रहिवाशांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत राज्यशासनाने तातडीने चौकशी करुन दोषींवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

## मा. मंत्री गृहनिर्माण यांचे निवेदन

(१) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील न.भू.क्र.६०८ (पैकी),६६८ (पैकी) या भूखंडावर बेहराम सुधार गृह.संस्था कार्यान्वित असून न.भू.क्र.६०८ (पैकी) ही मिळकत मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांची आहे तर न.भू.क्र.६६८ (पैकी) ही मिळकत महाराष्ट्र शासनाची आहे.

रोटा H/2049 (700-3-2021)-1

C:\zopasu १ २०२०\LAQ २०२०\पावसाळी अधिवेशन २०२०\नियम १०५ अन्वये लक्षवेधी सुचना श्री.सुभाष धोटे.docx

(२) मुळतः झोपडपट्टी पुनर्वसन योजना बी.एम.आर.डी.ए. ने सन १९८४-८५ मध्ये मंजूर केली होती आणि तत्कालीन नियोजन प्राधिकरण बृहन्मुंबई महानगरपालिकेने (MCGM) SRD अभिन्यासाला (Layout) मंजुरी दिली. अभिन्यासानुसार ११ इमारतींमध्ये ८६८ झोपडपट्टीधारकांसाठी १७३५३.०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या उक्त भूभागावर बेहराम सुधार समिती (BSS) आखण्यात आली होती. या ८६८ झोपडीधारकांपैकी ३९० झोपडीधारकांचे ५ पुनर्वसन इमारतींमध्ये पुनर्वसन करण्यात आले आहे आणि A-१, A-२, A-३, C-३ आणि B-५ जे १९९७ वर्षात १८०.०० चौ.फुटांच्या सदनिकांसह व्यापलेले आहे.

(३) सन १९९६ मध्ये एसआरए योजना लागू झाली आणि सदरहू योजना तत्कालीन धोरणानुसार सुरु असलेल्या एसआरडीचे एसआरए योजनेत रुपांतर केले. सक्षम प्राधिकारी यांनी ३०.०६.१९९८ च्या पत्रानुसार पात्र-अपात्रतेबाबत सुधारित माहिती पुढीलप्रमाणे आहे:-

एकूण झोपड्या १०१२, पात्र झोपडीधारक ५५०, अपात्र १५९, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे अभिप्रायासाठी पाठविलेले ३०३.

(४) सुधारित आशयपत्र दि.२०.०८.२००८ रोजी १३९१६.६८ चौ.मी क्षेत्रफळाकरीता वरीलप्रमाणे ५ इमारतींचा भूभाग वगळून निर्गमित करण्यात आले. तद्नुषंगाने ०५ इमारत (B-१, B-२, B-३,B-४) करीता मंजूर आराखडे २२५.०० चौ.फूट चटई क्षेत्रफळ सदनिकेकरीता दि.०३.०३.२००१ रोजी मंजूर करण्यात आले. पुनर्वसन इमारत क्र.B-४ करीता जोत्याचे बांधकाम परवानगी दि.१३.०३.२००१ रोजी निर्गमित करण्यात आली. या इमारतीमध्ये १६७ सदनिका प्रस्तावित होत्या. इमारतींकरीता भोगवटा प्रमाणपत्र दि.११.०२.२००५ व ११.०४.२००६ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. एसआरए योजनेचा अभिन्यास (Layout) दि.१५.०५.२००४ रोजी मंजूर झाला.

(५) शासन अधिसूचना दि.१६.०४.२००८ अन्वये पुनर्वसन सदनिकांचे चटईक्षेत्र २०.९० चौ.मी.(२२५.००चौ.फूट) ते २५.०० चौ.मी. (२६९.०० चौ.फूट) करुन सुधारित आशयपत्र दि.२५.०५.२०१० रोजी निर्गमित करण्यात आले.

(६) त्यानंतर ०४ इमारत (B-१X, B-१Y B-३X, B-२Y) /करीता मंजूर आराखडे २६९.०० चौ.फूट चटई क्षेत्रफळ सदनिकेकरीता दि.१३.१२.२०१० रोजी मंजूर करण्यात आले. बांधकाम परवानगी पुनर्वसन इमारत क्र.B-१X करीता दि.०२.०८.२०११ व B-३X करीता दि.२२.०३.२०११ रोजी जोत्यापर्यंतची बांधकाम परवानगी निर्गमित करण्यात आली.

(७) पुनर्वसन इमारत क्र.B-१X जोत्यापर्यंतचे बांधकाम ८०% जागेवर करण्यात आले असून रेल्वे भूखंड विवादामुळे सदर इमारतीस दि.२७.०५.२०१४ रोजी बांधकाम स्थगिती (Stop Work) देण्यात आली आहे.

(८) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील विक्री घटक इमारतीसाठी दि.०७.१२.२०११ रोजी आराखडे मंजूर करण्यात आले असून दि.११.०५.२०१२ रोजी जोत्यापर्यंतची बांधकाम परवानगी (CC) देण्यात आलेली आहे.

(९) उपरोक्त योजनेबाबत मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ म्हाडा यांच्या दि.१५.११.२०१६ रोजीच्या पत्रान्वये अनंत काणेकर मार्ग (जी-९), रुप नगर, वांद्रे पूर्व येथील मुंबई मंडळाच्या आराखडयातील पुनर्वसित इमारतीसमोर मुंबई मंडळाचा भूखंड असून गार्डनसाठी आरक्षित असल्याने विषयांकित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून वगळण्यात यावा, असे कळविले होते. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.१८.०४.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर योजनेकरीता गार्डनसाठी आरक्षित भूखंडावरील झोपड्यांसह मुळ परिशिष्ट-२ उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), बांद्रा यांनी दि.१३.०८.१९९७ रोजी निर्गमित केले होते व त्यानुषंगाने सदर योजना मंजूर करण्यात आली असून विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) परिशिष्ट-४ कलम २.८ अन्वये योजना पुढे कार्यान्वित करण्यात आल्याचे कळविलेले आहे.

(१०) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २०(२) अन्वये क्र.सी/कार्या-२क/कलम २०(२)/एस आर-३४/१६ दि.२७.०२.२०१९ रोजीच्या आदेशान्वये नगर भूमापन अधिकारी, बांद्रा यांनी न.भू.क्र.६६८(पै) क्षेत्र १९५६.८० चौ.मी. रेल्वेच्या हद्दीत समाविष्ट असल्याने त्याप्रमाणे अभिलेख दुरुस्ती करावी, असे नमूद केले आहे.

(११) नगर भूमापन अधिकारी/वांद्रे यांचेमार्फत सुधारित सिमांकन करुन विकासकाने विकास नियंत्रण नियमावली, २०३४ अन्वये सुधारित आशयपत्रांकरीता प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

(१२) तद्नंतर कलम १३(२) अंतर्गत विकासक बदलीबाबत व संस्थेतील झोपड्यांचा झोपडीनिहाय पुन:सर्वेक्षण करुन दि.०६.०५.२०१७ रोजी परिशिष्ट-२ गट अ,ब आणि क अशा तीन विभागांमध्ये विभागून पात्र-अपात्रता यादी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास पाठविली आहे.

(१३) सद्य:स्थितीत दि.२०.०८.२०१६ रोजीच्या अर्जानुसार कलम १३(२) अंतर्गत सुनावणी सुरु आहे.

*****

H/2049-7.